# “ ४८वी शोध यात्रा ”
# (हाथीदुंगा ते उत्तरेय, पश्चिम सिक्कीम)
# दिनांक : १७ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२३
# अहवाल

**आदरणीय महोदय,**

सृष्टी द्वारा वर्षातून दोनदा देशातील विविध राज्यात शोध यात्रेचे आयोजन केले जाते. यात्रेचे ठिकाण आणि रूट हे ऋतूनुसार त्या राज्यातील तापमान ज्या कालावधीत अधिक असते अशाच कालावधीत यात्रेचे आयोजन केले जाते. यामागील उद्देश हा स्थानिक लोक त्या परिस्थितीला तोंड कशा पद्धतीने देतात तसेच या दरम्यान त्यांची जीवनशैली काय असते. तसेच सहभागी शोध यात्रींना शारीरिक आणि मानसिक क्षमता ची ओळख व्हावी.  उदाहरणार्थ सिक्कीम मध्ये हिवाळयात थंडी अधिक असते तर यात्रेचा कालावधी देखील हिवाळा हाच असतो.

आयोजित सदर शोध यात्रेत मला अनेक व्यक्तिगत अनुभूती आल्यात. ज्याचा उपयोग मला व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनांत नक्कीच होत आहे. ज्याला तीन टप्प्यात मी सादर करू इच्छितो.

**१) शोध यात्रा रूपरेषा सारांश**

**२) शोधयात्रा अनुभवातून काय शिकायला मिळाले**

**३) राज्यात या पद्धतीचा काय प्रयोग/प्रकल्प करू शकतो**



**1. शोध यात्रा रूपरेषा सारांश :**

पश्चिम सिक्कीम जिल्ह्यात आयोजित ४८ वी शोधयात्रा दिनांक १७ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२३ दरम्यान ग्राम हाथीदुंगा ते ग्राम उत्तरेय पर्यंतच्या यात्रेचा उद्देश व घटना क्रम थोडक्यात खालील प्रमाणे मांडत आहे.





➢ **प्राथमिक/माध्यमिक शाळा भेटी :**

डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या Ignited Mind या विचाराला घेऊन विद्यार्थ्यां करिता सदर स्पर्धेचे आयोजन केले जाते.

ज्यात प्रामुख्याने विद्यार्थ्यां मधील सृजनशील आणि नाविन्यपूर्ण विचारांना चालना मिळावी म्हणून दोन टप्प्यात स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. प्रथम टप्प्यात विद्यार्थ्यांना स्थानिक देशी झाडांची ओळख व्हावी आणि त्यांचा उपयोग समजून ते ज्ञान एका पीडी कडून दुसऱ्या पिढी पर्यंत हस्तांतरित व्हावे हा उद्देश होता. दुसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांच्या कल्पना (Ignited Idea)

कल्पकतेला वाव मिळावा हा उद्देश होता. ज्यात दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणींना मात करण्यासाठी कोणते तंत्रज्ञान विकसित करता येईल ज्याचा उपयोग सर्वांना होऊ शकेल या अनुषंगाने विद्यार्थी आपली नाविन्यपूर्ण कल्पना मांडत होते. महत्वाचे म्हणजे यातून काही उपयोगी कल्पना यांना सृष्टी संस्था व national innovation foundation, अहमदाबाद यांच्या मदतीने प्रत्यक्षात यंत्र निर्मिती ते पेटंट नोंदणी पर्यंतचे मार्गदर्शन आणि सहाय्य उपलब्ध करून दिले जाते.

**उदाहरणार्थ :** शेल रोटी बनविण्याचे यंत्र, रुग्णालयात अति दक्षता कक्षात रुग्ण दाखल करून घेण्यास एका रुग्णालय ते दुसरे रुग्णालय आधीच माहिती पुरवणारे application विकसित व्हावे जेणे करून रुग्णास तत्काळ सेवा उपलब्ध होऊ शकेल व त्याची प्रकृती स्थिर करण्यास तत्परता येऊ शकेल. आपली बैठक (sitting posture) सुव्यवस्थित राहावी करिता अलार्म वाजवणारा बेल्ट/खुर्ची असावी. घरात चोर आल्याचे लक्षात यावे म्हणून दरवाज्यात mat मध्ये अलर्ट अलार्म बसविणे इ.






शाळेतील विद्यार्थ्यां समवेत स्पर्धेची काही क्षणचित्रे

➢ **स्वयं सहायता बचत गट (SHG) मार्फत प्रदर्शनी** :

स्थानिक ज्ञान तसेच शेतीतील उत्पादन, पारंपारिक खाद्य पदार्थ आणि व्यंजन बाबत माहिती देणारे स्टोल प्रत्येक शाळेत लावण्यात आला. ज्यात प्रामुख्याने शेल रोटी, शीष्णू, शतामल, गुरास,

पिंडालु, शिबी दाल, इस्कुस सब्जी**, अद्रक, इलायची, संत्रे,** राजमा, खुरी रोटी, मोंग-ची वाईन इ. प्रदर्शनी च्या माध्यमातून काही व्यंजनांचा आस्वाद घ्यायला मिळाले तसेच कंदमूळ, भाजीपाला, वनौषधी बघायला व त्यांचा उपयोग समजून घेण्यास चर्चेतून मदत झाली.

**मूल्यवर्धनाची आवश्यकता असणारे स्थानिक उत्पादन :**

१) हलदो/अद्रक (ginger) २) अलायची/इलायची : पश्चिम सिक्कीम जिल्ह्यात अद्रक आणि इलायची चे उत्पन्न मोठ्या प्रमाणात घेण्यात येत असून नैसर्गिक पद्धतीचे उत्पन्न असल्याने गुणवत्ता देखील अप्रतिम आढळून येते. स्वयं सहायता बचत गट (SHG) मार्फत सदर उत्पन्नाचे मूल्यवर्धन करून त्यातून उत्पन्नात वाढ होऊ शकेल याकरिता सृष्टी मार्फत प्रशिक्षण ते बाजारपेठ उपलब्धता पर्यंतचे सहाय्य केले जाणार आहे.



स्वयं सहायता बचत गट सोबत चर्चेतून स्थानिक व्यंजन समजून घेतांना चे क्षणचित्र

- **सांस्कृतिक कार्यक्रम :**

प्रत्येक गावात शाळेतील स्पर्धेचा कार्यक्रमा नंतर सांस्कृतिक कार्यक्रम होत असून विद्यार्थ्यां मार्फत सामुहिक नृत्य, ऐकल नृत्य, गायन सादर केले जात असे.

पश्चिम सिक्कीम भागात लेपचा हि स्थानिक आदिवासी जमात मोठ्या संख्येने आहे. सदर जमातीवर तसेच स्थानिक इतर जातींवर एकंदरीत सांस्कृतिक दृष्ट्या प्रभाव हा नेपाळी संस्कृतीचा अधिक दिसून येतो. ज्यात प्रामुख्याने पोशाख, खान-पान, नृत्य यांवर मोठा प्रभाव एकंदरीत सांस्कृतिक कार्यक्रमातून जाणवला. लेपचा जमाती च्या मूळ संस्कृती संदर्भात माहिती घेण्याचा प्रयत्न केला परंतु समाधानकारक उत्तर मिळाले नाही. वेळे अभावी जास्त चर्चा घडून न आल्याने लेपचा जमातीचा मुळ पोशाख आणि नृत्य संस्कृती समजून घेऊ शकलो नाही.





सांस्कृतिक कार्यक्रम काही क्षणचित्र

➢ **शोध यात्री सहभाग :**

- शोध यात्रीं मध्ये आपसात सहसंबंध प्रस्थापित होऊन परिचय व्हावा म्हणून दैनंदिनी व नियोजित कार्यक्रमानुसार विविध समित्या स्थापन करण्यात आल्यात. स्वयंसेवक म्हणून गरजेनुरूप छोट्या मोठ्या जबाबदारी पार पाडण्यात आली.
- सहभागी सर्व शोध यात्रींना स्थानिक जीवनशैली अनुभवायला, तसेच स्वताच्या शारीरिक आणि मानसिक क्षमता समजून घेण्याची संधी मिळाली.
- सहभागी सर्व शोध यात्रींच्या व्यवसायाचा तथा त्यांच्याकडील माहितीचा, विचारांचा उपयोग स्थानिकांना व्हावा हा उद्देश.
- आदरणीय प्रा.अनिल गुप्ता सर यांचे सोबत चर्चा सत्र व विचारांचे आदान – प्रदान



प्रा.अनिल गुप्ता सर यांचे सोबत चर्चा सत्र व विचारांचे आदान – प्रदान

➢ **पश्चिम सिक्कीम क्षमता आणि मर्यादा :**

सिक्कीम हे राज्य निसर्गाच्या सानिध्यात कांचनगंगा पर्वत रांगेच्या कुशीत वसलेले असून नेपाळ, भूतान आणि चीन च्या सीमे जवळ असलेले आहे. राज्याच्या पश्चिम जिल्ह्यातील काही गावाना शोधयात्रे दरम्यान समजून घ्यायची संधी मिळाली. काही बचत गट आणि स्थानिक ग्रामस्थांशी चर्चेतून येथील क्षमता आणि मर्यादा समजून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यातून समोर आलेले मुद्दे मांडत आहे.

**क्षमता :**

- मातृसत्ताक संस्कृती
- नैसर्गिक पद्धतीने शेतीचे उत्पन्न (भात, मका, अद्रक, इलायची, संत्रे, केळी इ.)
- जैव विविधतेची मुबलक उपलब्धता
- सहकार क्षेत्र (दुध उत्पादक सहकार सोसायटी)
- सार्वजनिक जबाबदारीची जाणीव व पालन (ODF VILLEGES)
- तणावरहित, समाधानी व आनंदी जीवनशैली

**मर्यादा :**

- स्थानिक उत्पादनावर भर नसल्याने दैनंदिन वापरायचे वस्तू मोठ्या प्रमाणात दिल्ली, पश्चिम बंगाल तसेच इतर राज्यातून आयात केले जाते. महिला व युवकांना घेऊन छोटे मोठे start-up सुरु होणे गरजेचे असून स्थानिक गरज यातून पूर्ण होऊ शकेल व रोजगाराचे प्रमाण देखील वाढेल.

- पारंपारिक घरांची शाश्वत पद्धती लोप पावत असून आता सिमेंट कॉन्क्रीट ची घर बांधण्यात येत आहे. डोंगराच्या उतारावर गाव वसलेली असल्याने भूकंप सारख्या आपत्कालीन परिस्थतीत पक्की घरं लागलीच पडतील. ज्यातून मोठ्या प्रमाणात जीवित व इतर हानी होण्याची शक्यता नाकारता  येत नाही.
- उच्च शिक्षणाच्या पुरेशा संधी जवळपास उपलब्ध नसून विद्यार्थ्यांची शाळेतील गळती चे प्रमाण देखील अधिक आहे. याकरिता स्थानिक नैसर्गिक परिस्थिती तसेच इतर अनेक बाबी कारणीभूत असून  यासंबंधाने ठोस पाऊले उचलने अत्यंत गरजेचे आहे,  हि खंत चर्चिलेल्या सर्वच ग्रामस्थांनी व्यक्त केली.
- पर्यटन विकासास अधिकचा आणि मुबलक वाव आहे परंतु याअनुषंगाने पर्यटन विकास झाल्याचे दिसून येत नाही.
- मद्य सेवन हा स्थानिक जमातीच्या जीवनशैलीतील प्रथा परंपरेचा भाग जरी असला तरी व्यसनाधीनतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून आले.

**2. राज्यात या पद्धतीचा पथदर्शी प्रयोग/प्रकल्प उभारणी :**

महाराष्ट्र अध्यापक विकास प्रबोधिनी, पुणे / राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान, मुंबई आणि राज्यातील महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने आपण राज्यात काही संकल्पना प्रकल्प म्हणून एका चळवळीच्या रुपात राबवू शकतो. याअनुषंगाने काही कल्पना सुचवाव्याश्या वाटतात, ज्याला विविधांगी संकीर्ण नियमोचीत अध्ययन करून मूर्त रूप देता येई शकते कृपया सकारात्मक विचार होऊन स्वीकार व्हावा, हि विनंती.

- महाविद्यालय स्तरावर जिल्ह्यातील स्थानिक Traditional Knowledge Bank उभारणी करिता प्रकल्प सुरु करू शकतो. ज्यात महाविद्यालयीन विद्यार्थी ग्राम स्तरावरील तळागाळातील पारंपारिक ज्ञान संग्रहित करून त्याचे दस्तऐवजीकरण करतील. अशा माहितीला वर्तमानपत्र, जर्नल्स, सोशल मिडिया इ. यांचे माध्यमातून प्रसिद्धी देखील देता येऊ शकेल. याद्वारे पारंपारिक ज्ञान एका पिढी पासून दुसऱ्या पिढीपर्यंत हस्तांतरित होऊन पारंपारिक ज्ञान आपण जतन व संवर्धन होण्यास मदत होईल. ज्याचा उपयोग समाज अधिक सक्षम होण्यास होऊ शकेल.
- स्थानिक महाविद्यालयांना सोबत घेऊन राज्यात विभागनिहाय Grassroots Innovators शोधून अशा नाविन्यपूर्ण कल्पनांचे/यंत्रांचे दस्तऐवजीकरण करून त्यांना पेटंट नोंदणी ते बाजारपेठ पर्यंत विविध संस्थांच्या मदतीने पोहचवता येऊ शकेल. तसेच याअनुषंगाने

कौशल्य युक्त कामगार निर्माण व्हावे करिता स्किल आधारित अभ्यासक्रम देखील निर्माण केला जाऊ शकतील. यातून यंत्राच्या उपलब्धता, वापर व दुरुस्ती ची उपलब्धता सहज होऊन परिणामी मागणी आणि पुरवठा सहज होऊ शकेल. ज्याचा उपयोग समाज अधिक सक्षम होण्यास तसेच राज्य आणि राष्ट्र विकासात हातभार लागू शकतो.

- महाराष्ट्र अध्यापक विकास प्रबोधिनी, पुणे मार्फत देश- विदेशातील अशा क्रियाशील पथदर्शी उपक्रमात राज्यातील शिक्षक व विद्यार्थी यांना सहभागी होण्या करिता संधी उपलब्ध करून दिली जाऊ शकते. ज्यातून मिळणारे अनुभव व्यक्तिगत आणि व्यवसायिक विकासास पूरक ठरून सोबतच इतर शिक्षक व विद्यार्थी यांचे पर्यंत पोहचवता येऊ शकेल.
- राज्यात विभाग निहाय विद्यापीठ स्तरावर आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. आपण शालेय/महाविद्यालयीन शिक्षण न घेतलेले किंवा जे सद्य स्थितीत कोणत्याच महाविद्यालयात शिक्षण घेत नाहीये अशा युवकांना देखील सोबत घेऊन दरवर्षी विद्यापीठ स्तरावर होत असलेल्या अविष्कार स्पर्धेत सहभागी करून घेत, अशा युवकांना देखील **Innovative Idea** सादर करण्याच्या संधी उपलब्ध होण्याची गरज आहे. ज्यातून येणाऱ्या नाविन्यपूर्ण कल्पनेला National Innovation Foundation Ahmadabad, IISER, Pune आणि अशाच उद्देशानुरूप कार्य करणाऱ्या देशातील इतर हि संस्थांच्या मदतीने साक्षात्कार ते पेटंट नोंदणी पर्यंत पोहचवता येऊ शकेल. यातून राज्यभरातून नव-नवीन संकल्पना समोर येऊ शकतात ज्याचा उपयोग समाज अधिक सक्षम होण्यास होऊ शकेल.
- राज्यात विभाग निहाय महाविद्यालय स्तरावर महाविद्यालयातील आजी-माजी विद्यार्थ्या करिता तसेच स्थानिक अशिक्षित युवक यांचे करिता Local to global start-up idea स्पर्धेचे आयोजन करू शकतो ज्यातून उद्यमशीलतेला वाव मिळू शकेल.

### 3. शोधयात्रा अनुभवातून काय शिकायला मिळाले :

- मला मुळात प्रेरणादायी गोष्टी ऐकायला आवडते ज्यातून व्यक्तीशः प्रेरणा घेऊन माझा जीवन प्रवास सकारत्मकतेने सुरु आहे. परंतु याचा उपयोग मी इतरांना प्रेरणा देण्या साठी करू शकतो कदाचित कोणाला त्याची गरज असू शकते आणि कोणाच्यातरी जीवनाला यातून मार्ग मिळू शकतो. हे मला शोध यात्रे दरम्यान आदरणीय प्रा. अनिल गुप्ता सर यांचे सहवासातून कळले. ज्याचा उपयोग आता मी माझ्या वर्गात विद्यार्थ्यांना दोन मिनिट स्टोरी च्या माध्यमातून सांगण्यास सुरुवात केलेली असून विद्यार्थ्यांना हा प्रयोग खूप आवडत आहे.

- आपले कुटुंबातील ज्येष्ठ लोकांकडील संग्रहित पारंपारिक ज्ञान हे आपण समजून घेतले पाहिजे याची गरज व महत्व मला शोध यात्रेत कळाले. जेव्हा मी स्वतःला हा प्रश्न विचारला तेव्हा मला कळले यासंदर्भातील मला स्वतःला काहीच माहितगिरी नाहीये, हे लक्षात आले. शोध यात्रेतून आले पासून मी कुटुंबातील व समाजातील इतर ज्येष्ठ लोकांकडून हे पारंपारिक ज्ञान समजून घेण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे. तसेच वर्गात विद्यार्थ्यांना हि आग्रहाने याचे महत्व आणि गरज काय ते सांगितले आहे. आपण आपल्या ज्येष्ठांशी ज्यात प्रामुख्याने घरातील आजी-आजोबा, गावातील जुने जानकार ग्रामस्थ यांचे सहवासात वेळात वेळ काढून बसा आणि चर्चा करा, गोष्टी ऐकून घ्या समजून घ्या आणि वर्गात इतरांना हि सांगा, जेणेकरून हे पारंपारिक ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढी पर्यंत आपण पोहचवू शकतो.
- स्थानिक पारंपारिक ज्ञान संग्रहित होऊन त्याचे दस्तऐवजीकरण व्हावे, करिता महाविद्यालय स्तरावर Local Knowledge Bank उभारणार असून या करिता आम्ही स्पर्धा आयोजन करण्याचे नियोजनात आहे.
- विद्यार्थ्यांच्या कृतीशील विचारांना वाव मिळावा म्हणून आजूबाजूला दैनंदिनीत भेडसावत असलेल्या प्रश्नांना/अडचणींवर तोडगा काय असू शकतात. याबाबत वर्गात चर्चा घडवून आणण्यास आम्ही सुरुवात केलेली आहे.
- वैयक्तिक माझ्या शारीरिक आणि मानसिक क्षमता मला सदर शोध यात्रेस सहभागी होऊन पुन्हा तपासून पाहता आल्यात. त्यातून स्वतःच्या क्षमतावरील विश्वास अधिक दृड झाला.
- स्थानिक आदिवासी लेपचा जमाती च्या काही रूढी, प्रथा-परंपरा, बोली भाषेतील शब्द उच्चार, गाणी समजून घ्यायला मिळाली. संपर्कात आलेल्या स्थानिकांचा गोड स्वभाव तसेच समाधानी आणि आनंदी जीवन जगण्याची जीवनशैली अनुभवायला मिळाली. ज्यातून मला समाधानी राहून आनंदी राहण्यास प्रेरणा मिळाली.
- यात्रे दरम्यान सिक्कीम मधील गाव Open Defecation Free (ODF) असल्याचे लक्षात आले. तेव्हा प्रथमतः विश्वास बसला नाही, कारण यासंदर्भातले देशभरातील आणि विशेषतः राज्यातील अनेक दाखले उराशी होते. जेव्हा स्थानिकांशी संपर्क आला आणि एकंदरीत कृतीतून बघण्यात आले तेव्हा याविषयावर स्थानिक लोकांशी मुद्दामहून अनौपचारिक चर्चा केली त्यातून येथील लोक सामुहिक आणि सार्वजनीक जबाबदारी निष्ठेने पाळतात याची अनुभूती आली.

- आदरणीय प्रा. अनिल गुप्ता सर यांचे अनुभव कथनपर गोष्टी जीवनाला सकारात्मक दिशा आणि ऊर्जा देणाऱ्या आहेत. ज्यात आदिवासींना जल, जंगल, जमीन या लडाईत आपण साथ देण्यास असमर्थ असलो तरी जानकारी च्या लडाईत आपण नक्कीच साथ देण्यास सक्षम आहोत. Learn, Link, Leverage, Legitimize (Honey Bee Network)
- अनेक तज्ञ मंडळी आपले संशोधन ग्रामीण आदिवासी समाजाला धरून तिथल्या भौगोलिक परिस्थितीला धरून करतात व आपले संशोधन प्रसिद्ध देखील करतात परंतु त्यात माहितीच्या मूळ स्त्रोताला डावलले जाते. ज्या स्थानिका कडून सदर ज्ञान घेतले जाते त्याचे क्रेडीट त्यांचे पर्यंत पोहचत नाही तसेच ते प्रसिद्ध झालेले ज्ञान देखील त्या गावापर्यंत पोहचत नाही. अशा माहितीच्या मूळ स्त्रोताला त्या गावाला ती माहिती पोहचली पाहिजे, त्याचे क्रेडीट संबंधित व्यक्तीला मिळाले पाहिजे.
- Eating Healthy and Thinking Healthy



कुमार प्रधान कुटुंबीय यांचे सोबत चर्चा

**टीप :** सदर अहवालात नमूद बाबींचा स्त्रोत हा विविध चर्चा व व्यक्तीशः अनुभव असून यात सुधारणेला वाव आहे.

**संदर्भ माहिती स्त्रोत :**

टीशेरींग, जोन, दीपक, कुमार प्रधान कुटुंबीय, राई कुटुंबीय, कोमल जी, प्रा.अनिल गुप्ता सर, चेतन पटेल, आयुष चेत्री, टेकनाथ शर्मा जी, धरमवीर जी, बिस्सू, म्यारी गोल्ड SHG, ASTER SHG, JASMINE SHG, रश्मीजी, पी.बी.गौतम बारथांग कुटुंबीय इ.



Pic Credit : Aditya

Shodhyatra, Sikkim Vibes

"अनुभूती "

निसर्गाची जाण ठेऊ सारे, निसर्गाचा मान ठेऊ सारे,
निसर्गातूनच मिळवू अन निसर्गालाच देऊ सारे...
माझं - आपलं आता पुरे, नको खोट्या विकासाचे नारे ...
शोध नाविण्याचा, कल्पकतेचा आणि सृजनशीलतेचा घेत
शाश्वत विकासाची वाट धरू सारे ...
चला, सृष्टी समजून घेण्यास सारी, सोबतीला निसर्ग घेऊ सारे...
कारण, निसर्गातच आहे ज्ञान खरे...निसर्गातच आहे ज्ञान खरे...

मी आदरणीय निपुण विनायक सर तसेच महाराष्ट्र अध्यापक विकास प्रबोधिनी, पुणे आयोजक चमू नेहा आणि सहकारी, सृष्टी संस्था, अहमदाबाद सोबत असलेला आमचा चमू ज्यात अदिती मॅडम, सुरज सर, गणेश, सविता, पंढरी, सदानंद व इतर सहकारी शोधयात्री यांचे आभार व्यक्त करतो, ज्यांच्या सहवासात व सोबतीने मला शोधयात्रेत सहभागी होऊन यात्रा यशस्वीपणे पूर्ण करता आली.

**आपला,**
**डॉ. विक्रांत र. जाधव (सहा.प्रा.)**
**सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ**

**शोधत्रेतील काही महत्वाची क्षणचित्रे**



अद्रक




इलायची



दुध उत्पादक सहकार सोसायटी



सिक्कीमीस पारंपारिक घर



घरा बाहेर सकारात्मक उर्जा प्रधान करणारे विचारांचे झेंडे लावण्यात येतात. मान्यतेनुसार सकारात्मक उर्जा हवे द्वारे घरात येऊन घरातील वातावरण प्रसन्न राहते.